# नगरपरिषद प्रशासन शाखा
# विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) नुसार
कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावयाचे

## १ ते १७ मुद्दे

**मँन्यूअल क्र.१**


**कलम ४(१)(b)(i)**

**पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील नगरपालिका शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांची कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| **1** | **शाखेचे नाव** | नगरपालिका शाखा |
| **2** | **पत्ता** | विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे |
| **3** | **कार्यालय प्रमुख** | सह आयुक्त |
| **4** | **शासकिय विभागाचे नांव** | नगरविकास विभाग |
| **5** | **कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त** | 1. नगर विकास विभाग<br>2.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई |
| **6** | **कार्यक्षेत्र** | विभागीय कार्यक्षेत्र<br>(सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर व पुणे या पाच जिल्ह्यांचे नागरी कार्यक्षेत्र) |
| **7** | **विशिष्ट कार्ये** | नगरपालिका प्रशासनाशी संबंधीत विभागातील 75 नगरपालिकाचे व 6 महानगरपालिकांचे संनियंत्रण, आढावा इ. |
| **8** | **कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक** | 02026362331 |

# संरचनात्मक तक्ता

## नगर परिषद प्रशासन शाखा, पुणे



## धोरणे कामाचे विस्तृत स्वरूप व उपलब्ध सेवा नगरपालिका कायद्याची अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे

अ. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये महाराष्ट्र शासनाने प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन म्हणून आयुक्तांना अधिसूचनेद्वारे घोषित केलेले आहे.

ब. नगरपरिषद प्रशासन शाखेत प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्तांच्या अधिनस्त खालील अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

सहआयुक्त १ पद,उपायुक्त १ पद ,अधीक्षक अभियंता १ पद ,सहायक आयुक्त गट अ पद १, सहायक आयुक्त (लेखा ) गट -अ, सहायक आयुक्त गट ब पद २,अधीक्षक पद २, सहायक ४ पदे अशी पदे कार्यरत आहेत.

## नगरपालिका शाखेतील कामाचे थोडक्यात स्वरुप खालीलप्रमाणे -

नगरपरिषद प्रशासन संबंधी नगरपरिषदाच्या सार्वत्रिक निवडणूकाबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील प्राप्त होणा-या सुचनेप्रमाणे कामे केली जातात, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३०८ (४) अपीलावर कार्यवाही करणे. तसेच आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील आदेशानुसार विभागातील नगरपरिषदा/नगरपंचायती वेळोवेळी प्रशासकीय तपासणी करणे व कामकाजावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे पार पडली जातात. महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत, जिल्हाधिकारी कार्यालयकडून माहिती संकलित करणे व शासनास पाठविणे.

**मँन्यूअल क्र.२**

**कलम ४(१)(अ) व (ब)**

**नगरपालिका प्रशासन शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांची कार्य व कर्तव्ये याबाबत तपशिल**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **कोणत्या कायद्या/ नियम/ शासननिर्णय/ परिपत्रकानुसार (प्रशासकिय आर्थिक व अर्ध- न्यायिक अधिकार व कर्तव्ये)** |
|---|---|---|
| 1 | विभागीय आयुक्त<br><br>सह आयुक्त | • >> महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 308(3) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशा वर कलम 308(4) अन्वये कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहे.<br>>> महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम 1987 मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या नगरसेवकाना अपात्र ठरविणे बाबत सुनावणी घेवून निर्णय घेणे.<br>>> विभागातील नगर परिषदाचे मुख्याधिकारी यांची वेतन निश्चिती करणे, 60 ते 120 या कालावधीतील रजा मंजूर करणे<br>>> आयुक्त तथा संचालक सोबतच सह आयुक्त नगरपालिका प्रशासन हे देखील वापर करण्यास सक्षम असलेले अधिकार खालील प्रमाणे -<br><u>अधिनियमातील कलम विषय</u><br><br>• 45(5) -कलम 45 खालील नगर परिषद सदस्यास अपात्र ठरविण्याच्या जिल्हाधिका-याच्या आदेशा विरुध्द अपील<br>• 49(2) (स) -कंपोस्ट खत तयार करण्यास नगर परिषदाना भाग पाडणे.<br>• 49(7) -शैक्षणिक किंवा इतर धर्मादाय संस्थाना अनुदान मंजूर करण्यास मंजूरी देणे.<br>• 56(4) -सततचे गैरहजेरी बद्दल अध्यक्ष/उपाध्यक्षांना अपात्र ठरविणा-या जिल्हाधिका-याच्या आदेशा विरुध्द अपील<br>• 62- नगर परिषदाना परिवहन समितीच्या नेमणुकीला मान्यता देणे.<br>• 88 (2)- शासनाकडून नगरपरिषदेस मिळालेल्या जमिनी शर्तभंगामुळे परत ताब्यात घेणे<br>• 97 (ब)(3) -नगर परिषदेच्या महसूलाच्या 2% पेक्षा जास्त परंतु 5% पर्यत रकमेचे अनुदान संस्थाना मंजूरी<br>• 99(1) नगर परिषदे कडील अतिरिक्त निधी सहकारी बॅंके मध्ये गुंतविण्यास मंजूरी देणे<br>• 307- नगर परिषदेकडून किंवा तिच्यावतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा केली जात असेल ती करण्यास त्यांच्या मते असलेला कोणताही आक्षेप किंवा तो पुरवू शकेल अशा कोणत्याही माहितीमुळे अशा नगर परिषदेने एखादी गोष्ट करणे त्यांच्या मते आवश्यक असेल अशी माहिती विचारात घेणे विषयी नगर परिषदेस फर्माविणे इ.<br>• 310 नगरपरिषदानी केलेल्या उधळपट्टी विरुध्द जिल्हाधिका-यानी दिलेल्या आदेशाविरुध्द अपील<br>• 311 नगरपरिषदेच्या कारभारा विषयी चौकशी आदेशीत करणे<br>• 318- नगरपरिषदेच्या आदेशाचे पुर्नरीक्षण किंवा फेरतपासणी (अधिनियमातील कलम 308(4) मधील प्रकरणामध्ये आयुक्त तथा संचालकांनी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेली अपीले वगळून) |

| | | |
|---|---|---|
| | | • आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश दि.01/01/2001 अन्वये अधिनियमातील तरतुदीनुसार संचालकाना असलेले मूळ अधिकार प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्तांना प्रदान केलेले आहेत ते खालील प्रमाणे -<br><br>i. 9(2) आरक्षणासह नगर परिषदेच्या सदस्यांची संख्या निश्चित करणे.<br>ii. 71- कलम 70 अन्वये विषय समितीच्या विषय वाटपाच्या उपविधींना मान्यता देणे.<br>iii. 71(अ)- स्थायी समिती वा विषय समितीचे अधिकार व कर्तव्ये आमसभा किंवा विशेष समितीव्दारे पार पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे.<br>iv. 75(अ) मुख्याधिकारी विषयक बाबी<br>v. 79(6) -कर्मचा-याना नगर परिषदेने दिलेल्या शिक्षेविरुध्दचे अपीलाची सुनावणी व निर्णय<br>vi. 97(अ) (ब)(1)(2) आणि नगरपरिषदेच्या हद्दीबाहेर निधी खर्च करण्यास मान्यता देणे.<br>vii. 301(एफ)(2) कलम 173(पोटकलम 3 अन्वये विक्री करण्यात आलेल्या किंवा भाडेपटटयाने दिलेल्या स्थावर मालमत्ते संबंधीच्या दाव्याच्या समेटास मान्यता देणे.<br>viii. 308(4) जिल्हाधिका-याचे आदेश बदलणे, रद्द करणे इ.<br>ix. 323 (3) (एफ) (4) उपविधी स्विकारण्यास भाग पाडणे.<br>x. 341 क्यु (3) औद्योगिकनगराचा ठराव रद्द करणे संबंधीचा जिल्हाधिकाऱ्याचा आदेश रद्द करुन निरसीत करणे<br><br>>> विभागातील 5 जिल्हयांमध्ये असलेल्या नगर परिषदे/नगरपंचायतीच्या कामकाजावर संनियत्रण ठेवणे. नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांचे 60 ते 120 दिवसा पर्यतची अर्जीत/परावर्तीत रजा मंजूर करणे. |
| 2 | अधीक्षक अभियंता | >> नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दिलेले कामकाज PMAY व इतर योजनांचा आढावा, नमामि चंद्रभागा योजना संबंधित कामकाज |
| 3 | उप आयुक्त | >> माहितीचे अधिकार कायद्या खाली अ वर्ग 03,ब वर्ग 13,क वर्ग 34 नगरपालिकाचे व 25 नगरपंचायती तसेच सहायक आयुक्त गट ब. यांनी दिलेल्या माहिती वरील अपीलीय अधिकारी.<br>>> सहायक आयुक्त गट ब. नगरपरिषदामार्फत सादर करण्यात आलेली फाईल तपासून व त्यावर अभिप्राय देवून विभागीय आयुक्तांकडे सादर करणे.<br>>>आहरण व संवितरण यांचे नियंत्रण अधिकारी. |
| 4 | सहायक आयुक्त लेखा गट अ | >>आहरण व संवितरण अधिकारी आणि वित्त विषयक कामकाज. |
| 5 | सहायक आयुक्त गट ब. | >> विभागातील कामकाजात सर्वात कमी प्रतवारी असलेल्या नगरपरिषदाना आवश्यकतेनुसार क्षेत्रभेटी देणे.<br>>> माहितीचे अधिकार कायद्याअंतर्गत "शासकीय माहिती अधिकारी" म्हणून काम करणे<br>>> नगरपरिषद शाखेतील सर्व संकलनाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे. |
| 6 | अधिक्षक/ सहायक/ लेखापाल/ लेखापरीक्षक | नगरपालिका शाखेतील सर्व कामे तसेच संगणका वरील आवश्यक कामे.<br>>> पाक्षिक बैठकी साठी गोषवारा तयार करणे. वेतन निश्चिती आणि इतर बिलासंबंधित बाबी. |
| 7 | शिपाई | कार्यालयाची स्वच्छता, कोषागाराशी संबंधित कर्तव्ये इ. |

**मँन्यूअल क्र.३**

**कलम ४(१)(b)(iii)**

**निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करून कार्यपध्दतीचे प्रकाशन**

| **अ.क्र.** | **कामाचे / निर्णय प्रक्रियेचे नाव** | **कालावधी** | **कामाची प्राथमिक जबाबवदारी** | **जबाबदारीची व उत्तरादायित्वांची शृंखला** |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३०८(४) | ६ महीने | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |
| २ | महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम 1987 मधील तरतुदीनुसार | - | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |
| ३ | विभागातील मुख्याधिकारी यांच्या आस्थापना विषयक बाबी | - | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |
| ४ | नगरपरिषदेची प्रतवारी ठरविणे | | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |
| ५ | विभागातील नगरपरिषदाचे निवडणूक विषयक कामकाज | राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेला | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |
| ६ | विभागातील महानगरपालिका, नगरपरिषदाचे निवडणूक विषयक कामकाज | राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेला | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |
| ७ | स्वच्छ भारत मिशन | शासनानने विहित केलेला | सहायक आयुक्त, गट-ब | विभागीय आयुक्त |

**मँन्यूअल क्र.४**

**कलम ४(१)(b)(iv)नमुना अ**

**नगरपालिकेच्या शाखेच्या संदर्भात सर्व सामान्यपणे ठरवलेली आर्थिक व भौतिक उद्दिष्टे**

| अ.क्र | अधिकार पद | कामकाज | भौतिक उद्दिष्टे (एकांकात) | आर्थिक उद्दिष्टे | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | निरंक | | | | | |

## नगरपरिषद प्रशासन शाखेतील कामकाज

सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन शाखा,विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग ,पुणे या पदानुसार पुणे विभागातील सर्व नगरपरिषदा नगरपंचायती याकरिता सनियंत्रण अधिकारी म्हणून कामकाज पाहणे.

- पुणे विभागातील नगरपालिका,नगरपंचायती यांचे कामकाजावर सनियंत्रण व समन्वय ठेवणे. मुख्याधिकारी,नगरपालिका संवर्ग कर्मचारी व नगरपालिका कर्मचारी यांचे आस्थापना विषयक बाबी वित्त विषयक बाबी यांची पडताळणी करणे
- शासन नगरविकास विभाग, आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय ,नवी मुंबई आणि जिल्हा सह आयुक्त तसेच नगरपरिषदा, नगरपंचायती स्तरावरील यंत्रणा यामध्ये समन्वय साधणे.
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार विहित कार्यवाही करणे.
- माहिती अधिकार 2005 अधिनियम, आपले सरकार, **PG** पोर्टल बाबतच्या अर्जांचा विहीत वेळेत निपटारा करणे.
- शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे बाबत निर्देश देणे व वेळोवेळी आवश्यक असलेली माहिती शासनास विहित वेळेत देणे.
- स्वच्छ भारत अभियान,नमामी चंद्रभागा,माझी वसुंधरा अभियान इत्यादी योजनांची अंमलबजावणी करणे बाबत निर्देश देणे.
- केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे अंमलबजावणीबाबत आढावा घेणे.

## Functions of the Municipal Council Administration Branch

Joint Commissioner, Municipal Council Administration Branch, Divisional Commissioner's Office, Pune Division act as monitoring officer for all municipal councils of Pune Division.

- Monitoring and coordinating Municipal council and nagar panchayats in Pune division. Verification of establishment matters, and financial matters of Chief Officer, Municipal Cadre Employees and Municipal Employees.

- Coordination between Government DMA office (Directorate of Municipal Administration) and DAO (District Administrative Office).

- To take appropriate action as per the provisions of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Towns Act, 1965.

- Disposal of RTI application under RTI 2005 Act within the prescribed period.

- Implementation of various schemes of the Government. give the necessary information to the Government from time to time within the prescribed time.

- Implementation of schemes like Swachh Bharat Abhiyan, Namami Chandrabhaga, Mazi Vasundhara Abhiyan, Carbon Neutrality etc.

**मँन्यूअल क्र.५**

**कलम ४(१)(b)(v) नमुना (अ)**

**नगरपालिका शाखेच्या कामाशी संबंधीत नियम/ अधिनियम**

| अ.क्र. | अधिनियम व नियम |
|---|---|
| 1 | महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती व  औद्योगिक नगरी अधिनियम 1965 |
| 2 | महाराष्ट्र स्थानिक  प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम  1987 |
| 3 | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 |
| 4 | महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 |
| 5 | मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 |
| 6 | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 |
| 7 | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 |
| 8 | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील नियम) 1971 |
| 9 | माहिती अधिकार अधिनियम 2005 |

## नगरपालिका कामाशी संबंधीत कामाशी महत्वाचे संबंधीत शासन निर्णय/ आदेश व परिपत्रके

| अ. क्र | शासन निर्णय तारीख | शासन निर्णयानुसार दिलेले विषय |
|---|---|---|
| 1 | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपसू 2001/प्रक्र 1/2001/5 दि.1/1/2001 | नगरपरिषद अधिनियमातील अधिकाराचे विकेंद्रीकरण |
| 2 | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नप्रसई 1020/प्रक्र 136/7 दि.20/4/01 | रोजंदारी वरील कर्मचा-यांना नगरपरिषद सेवेत नियमीत करण्या करिता अधिकार प्रादेशिक संचालक न.पा.प्र. यांना प्रदान करण्या बाबत |
| 3 | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपप्रस 1 ते 6/1 ते 34 न.प.सर्व अनियमीत धोरण 2005/प्रक्र 389 26 दि.16/5/05 | नगरपरिषदांनी विहीत पध्दतीचा अवलंब न करता मंजूर व रिक्त पदा वर केलेल्या अनियमीत नेमणूका नियमीत करणे बाबतचे अधिकार प्रादेशिक संचालक न.पा.प्र. यांना प्रदान करण्या बाबत |
| 4 | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपप्रस 4/20/949/1 वय शिथील 2004/प्रक्र 393(5)/26 दि.13/1/06 | नगरपरिषद आस्थापने वरील कर्मचा-याचे नेमणूकीच्या वेळी अधिक असलेले वय क्षमापना बाबतचे अधिकार प्रादेशिक संचालक न.पा.प्र. यंना प्रदान करण्या बाबत |
| 5 | महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.टंचाई 2099/प्रक्र 14/पापु 14 दि.2/2/99 | उन्हाळयात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी क्षेत्रात तातडीच्या पाणी पुरवठा योजना |
| 6 | आयुक्त राज्य निवडणूक आयोग आदेश क्र.रानिआ/मनपा 2005/प्रक्र 17/2/5 दि.3 मे 05 | नागरी क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करणे बाबत सुधारीत आदेश |
| 7 | संचालक, न.पा.प्र.मुंबई स्था.नि.क्र.नपसई.नगर परिषद नियंत्रण 2005/प्रक्र/373/32 दि.11/5/05 | नगरपरिषदाचे कामकाज नियंत्रणा साठी 20 कलमी कार्यक्रम विहीत करणे बाबत |
| 8 | संचालक, न.पा.प्र.मुंबई स्था.नि.क्र.नपसई.नगर परिषद नियंत्रण 2005/प्रक्र/414/32 दि.8 /6/05 | नगरपरिषदाची प्रतवारी ठरविण्याबाबत |
| 9 | आयुक्त तथा संचालक न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपाप्रस 2005/माअ 1708/3 दि.16/5/06 | केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये अपीलीय प्राधिकारी /शासकीय माहिती अधिकारी/सहा. माहिती अधिकारी नियुक्त करणे बाबत |
| 10 | प्रधान सचिव,नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई याचेकडील क्र.डीएम एन /5006/ 270/प्र.क्र.65/2006/नवि 32, दि.12.10.06 तसेच शासन राजपत्र दि12/10/06 | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अधिनियम (महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणुका घेणे) नियम 2005 मध्ये सुधारणा करण्यात येवुन महापौरांची अथवा उपमहापौरांची निवड करण्यासाठी बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. |
| 11 | शासन राजपत्र दि.27.2.2007 | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 यामध्ये सुधारणा करण्यात येवुन प्रकरण 3 मध्ये 31अ समाविष्ट करण्यात आलेला आहे त्यामुळे महापालिकांमध्ये मान्यता प्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षाची किंवा गटांचे |

| | | |
|---|---|---|
| | | तौलनिक संख्याबळ महापालिकेच्या विविध समितींवर सदस्यांचे नामनिर्देशन करतांना विचारात घेण्यात येईल. |
| 12 | उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. बीएमएन /5006/392 /प्र.क्र.93/ नवि 32,दि. 2/3/ 2007 | सन 2007 चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.2 पक्षाची आघाडी अथवा गट याची नोंदणी करण्याबाबतचे प्राधिकारी |
| 13 | कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.बीएनएम/2008/ 295/प्र.क्र.106/2008/नवि 32, दि.12.12.08 | महानगरपालिकांमधील स्थायी समिती आणि इतर समित्यांच्या सभापतीपदाची निवडणुक घेण्यासाठी पीठासीन अधिका-याची तरतुद करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती ,परिवहन समिती,प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणुक)(सुधारणा)नियम 2008 |

**मॅंन्यूअल क्र.६**
**कलम ४(१)(अ)**(vi)
**नगरपालिका शाखेतील दस्ताएवाजांची वर्गवारी**

| अ.क्र | विषय | दस्तएवजांचा प्रकार नस्ती/मस्टर/नोंद पुस्तक /व्हाउचर | प्रमुख बाबींचा तपशीलवार | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | अ,ब,क,ड वर्गवारी नुसार |

## मॅंन्यूअल क्र.७
## कलम ४(१)(ब)(vii)
## नगरपालिका शाखेच्या परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था

| अ.क्र | सल्लामसलतीचा विषय | कोणत्या अधिनियामा/नियम/परिपत्रकाद्वारे | पुनुरावृत्ती काल |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## मॅन्यूअल क्र.८
## कलम ४(१)(ब)(viii)नमुना अ
## नगरपालिका शाखेच्या संदर्भातील समितीची यादी प्रकाशित करणे.

| अ.क्र. | समितीचे नाव | संबंधित शासन निर्णय | समितीचे सदस्य संख्या | मा.विभागीय आयुक्त यांचे समितीतील स्थान | समितीचे सदस्य सचिव यांचे पदनाम | समितीचे उद्दिष्ट्य | समितीची एका वर्षात किती वेळा बैठक घेणे आवश्यक आहे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा स्तरीय पाणी पुरवठा समस्या समिती | उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. 126/2022 (वाघोली हौसिंग सो. असो. व इतर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) निकालातील आदेशानुसार | अध्यक्ष- मा. विभागीय आयुक्त, पुणे.<br>सदस्य- 1. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका 2. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.<br>3. मुख्य अभियंता (पाणी पुरवठा) व त्यांचे प्रतिनिधी, पुणे महानगरपालिका (सदस्य सचिव)<br>4.मुख्य अभियंता (पाणी पुरवठा) व त्यांचे प्रतिनिधी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>5.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,पुणे | अध्यक्ष | मुख्य अभियंता (पाणी पुरवठा) व त्यांचे प्रतिनिधी, पुणे महानगरपालिका (सदस्य सचिव) | पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील पाणी कमतरता,तूट व समस्या तसेच पाणी टँकर सुविधा याबाबतचे प्रश्न मार्गी लावणेकरिता नियोजन करणे | 6 वेळा (दोन महिन्यातून एकदा) |
| २ | पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट 34 गावांच्या मूलभूत सोयी सुविधांसाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती | कार्यासन अधिकारी, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.21/06/2023 रोजीचे पत्र क्रमांक पीएमसी-2023/प्र.क्र.268/नवि-22 | पत्र क्रमांक नपा 1/ कावी/697/2023 दिनांक 29 ऑगस्ट 2023 रोजीचे पत्रान्वये विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येणाऱ्या समितीमध्ये सदस्य पदी नियुक्त करण्याचे शासन स्तरावरून आदेश होण्यासाठी मा. प्रधान सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे प्रस्तावित करण्यात आले आहे. | अध्यक्ष | - | पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना मूलभूत सुविधा उपलब्ध होणे करता नियोजन | याबाबत शासन स्तरावरून कोणतेही स्पष्ट निर्देश दिलेले नाही |
| ३ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या दाव्यांचा निपटारा करण्याकरता तक्रार निवारण समिती | **महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-2017 / प्र. क्र. 157/नवि - 20 दिनांक 27 जून 2017** | अध्यक्ष- मा. विभागीय आयुक्त, पुणे.<br>सदस्य-1. सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन<br>2.संबंधित महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी (सचिव) | अध्यक्ष | संबंधित महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी (सचिव) | महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक बाबींच्या दाव्यांचा जलद निपटारा करण्याच्या दृष्टिकोनातून विभागीय आयुक्त स्तरावर तक्रार निवारण समिती | याबाबत शासन स्तरावरून कोणतेही स्पष्ट निर्देश दिलेले नाही |
| ४ | PUMTA | महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. -पी एमआर-३३१९/प्र.क्र..०७/नवि-७ मंत्रालय, मुंबई दि. ०४ जून २०१९ | अध्यक्ष- मा. विभागीय आयुक्त, पुणे.<br>सदस्य- १. मा. जिल्हाधिकारी,पुणे.<br>२.मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉ. लि. पुणे.<br>३. मा.महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>४. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका.<br>५. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.<br>६. मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर.<br>७. मा.पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.<br>८. मा.परिवहन आयुक्त, पुणे<br>९.मा. पोलीस अधीक्षक, पुणे शहर<br>१०.मा.पोलीस आयुक्त, | अध्यक्ष | ३. मा.महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | पुणे व परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेस चालना देणे, वहातुक विषयक विविध समस्या सोडविण्यासाठी पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधीकरणाची स्थापना (PUMTA) | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पिंपरी चिंचवड<br>११.मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.<br>१२. मा.व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानागर परिवहन महामंडळ.<br>१३.मा. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे.<br>१४. मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,पुणे.<br>१५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.<br>१६ प्रादेशिक अधिकारी, पर्यावरण विभाग, पुणे.<br>१७. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांचे प्रतिनिधी.<br>१८. परिवहन क्षेत्रातील तज्ञ.<br>१९. परिवहन अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ञ.<br>२०. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. | | | | |
| ५ | 1) समावेशन | १) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एम.सी.ओ.-२०१५/प्र.क्र.१३९/नवि-१४, दिनांक ०५ जुलै २०१६<br>२) आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.न प प्र सं/ नप/आकृतीबंध/ समावेशान/प्र.क्र. ७/२०१७ दि:- ०७ फेब्रुवारी२०१७<br>३) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१६/ प्र.क्र.-३०१/ भाग-१/नवि-१४, दि.२२/०९/२०१७<br>४) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१७/प्र.क्र.-२२/नवि-१४, दि.३०/११/२०१७<br>५) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१७/प्र.क्र.-२२/नवि-१४, दि.२०/०८/२०१८<br>६) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१७/प्र.क्र.-२२/नवि-१४, दि.११/०७/२०१९<br>७) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२१/प्र.क्र.-१२/नवि-१४,०६/१२/२०२१<br>८) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२१/प्र.क्र.-२०६/नवि-१४, दि.१०/०२/२०२२ | अध्यक्ष - मा. विभागीय आयुक्त<br>सदस्य - सह आयुक्त नपा शाखा , मान्य टिपणीनुसार<br>सदस्य सचिव- उपायुक्त नपा शाखा | अध्यक्ष | उपायुक्त नपा शाखा | नवनिर्मित नगरपरिषद/नगरपंचायत मध्ये तत्कालीन ग्रामपंचायतकालीन कर्मचारी यांचे समावेशन | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | विभागीय परीक्षा | नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील पत्र क्र. नपप्रस /२०२२ /सर्व नपा /पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षा /प्र. क्र.४५/कक्ष ४ दि. १७/१/२०२३ | अध्यक्ष - मा. विभागीय आयुक्त<br>सदस्य - 1)सह आयुक्त नपा शाखा<br>2) मागासवर्गीय राजपत्रित अधिकारी गट ब<br>3) सहायक आयुक्त - नपा शाखा<br>सदस्य सचिव - उपायुक्त नपा शाखा | अध्यक्ष | उपायुक्त नपा शाखा | नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापना वरील कर्मचारी यांची विभागीय परीक्षा आयोजित करणे | |
| ७ | नमामि चंद्रभागा प्राधिकरण | -नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन दि.१२/०८/२०१६ रोजीच्या निर्णय | **-शक्तिप्रदत्त समिती :**<br>१. मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन - अध्यक्ष<br>२. अ. मु. स/प्रधान सचिव/सचिव,नियोजन विभाग - सदस्य<br>३. अ.मु. स/प्रधान सचिव/सचिव,नियोजन विभाग - सदस्य<br>४. अ.मु. स/प्रधान सचिव/सचिव,वित्त विभाग - सदस्य<br>५. अ. मु. स/प्रधान सचिव/सचिव,नगर विकास विभाग(2) - सदस्य<br>६. अ. मु. स/प्रधान सचिव/सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - सदस्य<br>७. अ.मु. स/प्रधान सचिव/सचिव,उद्योग विभाग - सदस्य<br>८. अ. मु. स/प्रधान सचिव/सचिव,पर्यावरण विभाग- सदस्य<br>९. अ. मु. स/प्रधान सचिव/सचिव,ग्राम विकास विभाग - सदस्य<br>१०. अ. मु. स/प्रधान सचिव/सचिव,जलसंपदा विभाग - सदस्य<br>११. संचालक(निरी),नागपूर- सदस्य<br>१२. सदस्य सचिव,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सदस्य<br>१३. आमंत्रित सदस्य -सदस्य<br>१४. विभागीय आयुक्त,पुणे -सदस्य | विभागीय आयुक्त सदस्य सचिव | | रु.१५ कोटींच्या वरच्या कामाना नमामि चंद्रभागा अभियान अंतर्गत मंजूरी देणे | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सचिव | | | | |
| | | | विभागीय कार्यकारी समिती :<br>१) मा. जिल्हाधिकारी, पुणे<br>२) मा. जिल्हाधिकारी, सोलापूर<br>३) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका<br>४) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>५) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर<br>६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे<br>७) मा. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे<br>८) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे<br>९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | विभागीय आयुक्त अध्यक्ष | सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे | रु.१५ कोटींच्या खालील कामाना तत्वतः व प्रशासकीय मंजुरी देणे. | |
| ८ | PMRDA इंद्रायणी नदी प्रदूषण बाबत | नगरविकास विभाग शासन निर्णय दि.टिपीस-१८२७/प्र. क्र. ६०/२०२३/ नवि २३ दि.१९.०७.२०२३ | १. विभागीय आयुक्त, महसूल विभाग, पुणे.<br>२. मा. वि.स.स. श्री. सुनिल शेळके<br>३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, पुणे.<br>४. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.<br>५. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.<br>६. सह संचालक, नगर रचना पुणे विभाग, पुणे<br>७. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक अधिकारी, पुणे.<br>८. जिल्हाधिकारी, पुणे. | अध्यक्ष | आयुक्त, PMRDA | पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमधील विकास प्रकल्पांमध्ये झालेल्या अनियमितता तसेच सदर इंद्रायणी नदीमध्ये होणाऱ्या प्रदूषणाबाबत | २ महीने |
| ९ | मा. राष्ट्रीय हरित लवाद | मा. राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिलेल्या आदेशानुसार मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयबाबत २ समित्या गठित करण्यात आल्या आहे | जिल्हाधिकारी, सांगली, आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, MPCB ई. | अध्यक्ष | आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका | सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन आढावा | ३ महीने |
| | | | सदस्य- जिल्हाधिकारी पुणे, आयुक्त, पुणे महानगरपालिका, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे कटकमंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, खडकी कटकमंडळ | अध्यक्ष | प्रादेशिक अधिकारी, MPCB | णे शहरात निर्माण झालेल्या पुराच्या धोक्याबाबत कार्यवाही | ३ महीने |
| १० | शहर सौंदर्यीकरण स्पर्धा | नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दि01/03/2023 | १) विभागीय आयुक्त,<br>२) जिल्हाधिकारी,<br>३) मान्यता प्राप्त वास्तुविशारद<br>४) मान्यता प्राप्त कलाकार<br>५) सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा | अध्यक्ष | सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे | शहर सौंदर्यीकरण स्पर्धा | - |
| ११ | मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धा | नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. स्वमअ-२०२२/प्र.क्र.१२६/नवि-३४, दि.१५.०९.२०२३ | १) विभागीय आयुक्त,<br>२) जिल्हाधिकारी,<br>३) सह सचिव/ उप सचिव नगर विकास विभाग<br>४) मान्यता प्राप्त वास्तुविशारद<br>५) मान्यता प्राप्त कलाकार<br>६) सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा | अध्यक्ष | सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे | मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धा | - |

**मॅन्यूअल क्र.९**

**कलम ४(१)(b)(ix)**

**नगरपालिका शाखेतील अधिकारी/ कर्मचारी यांची नावे व मासिक वेतन भत्ते याबाबतचा तपशील**

| अ. क्र. | पदनाम | अधिकारी कर्मचारी यांचे नावे | वर्ग | वेतन श्रेणी | दुरध्वनी क्र./फॅक्स /ईमेल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सह आयुक्त | श्री.चंद्रकांत खोसे | अ | S-25 78800-209200 | कार्यालयीन दुरध्वनी क्र. ०२०- २६३६२३३१ ईमेल- rdmapune@gmail.com |
| 2 | अधिक्षक अभियंता | श्री.भरत शिंदे | अ | S-25 78800-209200 | |
| 3 | उपायुक्त | श्री.प्रताप भोसले (अतिरिक्त कार्यभार ) | अ | S-23 67700-208700 | |
| 4 | सहायक आयुक्त लेखा (गट अ ) | श्री.प्रताप भोसले | अ | S-20 56100-177500 | |
| 5 | सहायक आयुक्त (गट अ ) | श्री.चंद्रकांत भोसले | अ | S-20 56100-177500 | |
| 6 | सहायक आयुक्त (गट ब ) | श्रीमती.प्राची कचरे | ब | S-15 41800-132300 | |

**टिप :-**1. वरील 1 ते 6 अधिकारी कर्मचारी यांना त्यांचे नावा समोर नमुद वेतन श्रेणी मध्ये त्यांचे सेवेनुसार योग्य त्या टप्प्यावरील मुळ वेतन मिळते.

2.एकूण मुळ वेतनाचे 55% रक्कम महागाई वेतन म्हणून मिळते. वेळोवेळी निर्गमित शासन आदेशानुसार महागाई भत्ता अदा केला जातो.

3. या शिवाय मुळवेतन + महागाई वेतन अशा येणा-या रकमेवर वेळोवळी जाहीर होणारा वेतन नियमानुसार अनुज्ञेय रक्कम मिळून एकून वेतन मिळते

**मँन्यूअल क्र.१०**

**कलम ४(१)(b)(x)**

**नगरपालिका शाखेतील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतनाची विस्तृत माहिती प्रकाशित करणे**

| अ.क्र. | वर्ग | मूळ वेतन + ग्रेड वेतन | | इतर अनुशेष | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | नियमित शहर भत्ता | प्रसंगानुसार (जसे प्रवास भत्ता) | विशेष (जसे प्रकल्प भत्ता, प्रशिक्षण भत्ता |
| १ | अ | वेतन नियमानुसार लागू | | | | निरंक |
| २ | ब | | | | | निरंक |
| ३ | क | | | | | निरंक |

**मॅन्युअल क्र. ११**
**कलम ४ (१) (ब) (xi)**

नगरपरिषद प्रशासन शाखेचा मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशील याची विस्तृत माहिती प्रकाशित करणे

अंदाजपत्रकाच्या प्रतीचे प्रकाशन

अनुदानाच्या वितरणाच्या प्रतीचे प्रकाशन

| अ.क्र | अंदाजपत्रकीय शिर्षाचे वर्णन | अनुदान | नियोजित वापर (क्षेत्र व कामाचा तपशील ) | अधिक अनुदान अपेक्षित असल्यास रुपयात | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | |

**मॅन्युअल क्र. १२**
**कलम ४(१) (ब) (xii)**
**नगर पालिका शाखेतील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपद्धती**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| निरंक | | |

**कलम ४(१) (ब) (xii) (नमुना ब)**
**अनुदान कार्यक्रमअंतर्गत लाभार्थींची विस्तृत माहिती प्रकशित करणे योजना /कार्यक्रमाचे नाव**

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव व पत्ता | अनुदान/लाभार्थी यांची रक्कम स्वरूप | निवड पात्रतेचे निकष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**मॅन्यूअल क्र. १३**

**कलम ४(१) (ब) (xiii)**

**नगरपालिका शाखेतून मिळणाऱ्या/सवलतीचा परवाना याची चालू वर्षाची तपशिलवार माहिती परवाना/परवानगी/सवलतीचे प्रकार**

| अ.क्र. | परवाना धारकाचे नांव | परवान्याचा प्रकार | परवाना क्रमांक | दिनांका पासून | दिनांका पर्वत | साधारण अटी | परवान्याची विस्तृत माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | | | |

**मॅन्यूअल क्र. १४**

**कलम ४(१) (ब)** (xiv)

**नगरपालिका शाखेत माहितीचे इलेक्टॉनिक स्वरुपात साठविलेली माहिती प्रकाशित करणे चालू वर्षाकरीता**

| अ.क्र. | दस्तऐवजाचा प्रकार | विषय | कोणत्या इलेक्ट्रॉनिक नमुन्यात | माहिती मिळविण्याची मुदत | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| १. | टेप | सध्या या इलेक्ट्रॉनिक नमुन्यात माहिती उपलब्ध नाही. | | | |
| २. | फिल्म | | | | |
| ३. | सीडी | | | | |
| ४. | फ्लॉपी | | | | |
| ५. | इत्तर कोणत्याही स्वरुपात | | | | |

**मँन्युअल क्र. १५**

**कलम ४(‘१) (ब) (xv)**

**नगर पालिका शाखेत उपलब्ध सुविधांचा तक्ता प्रकाशित करणे**

| अ.क्र. | सुविधा प्रकार | उपलब्धता तपशील |
|---|---|---|
| १ | वेबसाईट विषयी माहिती | विभागीय आयुक्त कार्यालयाची वेबसाईट आहे https://divcompune.maharashtra.gov.in/ |
| २ | कॉलसेंटर विषयी माहिती | कॉलसेंटर नाही |
| ३ | अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती | विनंतीवरून अभिलेख तपासणीसाठी अभिलेख उपलब्ध करून दिले जातात . |
| ४ | कामाच्या तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती | कार्यालयीन वेळेत कोणी अभिलेख पाहण्याची इच्छा व्यक्त केल्यास दाखविणेची व्यवस्था आहे . |
| ५ | नमुने मिळण्याबाबत उपलब्ध माहिती | ---- |
| ६ | सूचना फलकाची महिती | विभागीय आयुक्त कार्यालयाचे सूचना फलक वापरण्यात येतात. |
| ७ | ग्रंथालय विषयी माहिती | ---- |

- **भेटण्याच्या वेळे संदर्भात माहिती**

| अ.क्र. | सुविधेचा प्रकार | वेळ | जबाबदार व्यक्ती | तक्रार निवारण |
|---|---|---|---|---|
| १ | भेटण्याच्या वेळे संदर्भात माहिती | कार्यालयीन वेळेत | सह आयुक्त, नगरपरिषद, प्रशासन शाखा | तक्रार अर्जदाराचे निवेदन समजून घेणे व संबंधित जिल्हाधिकारी/मनपा आयुक्त /मुख्याधिकारी यांना पत्र लिहून तक्रार निवारण करणेबाबत कळविले जाते व त्याचा अहवाल मागविला जातो |

**मॅन्यूअल क्र. १६**

**कलम ४(१) (ब) (xiv)**

**नगरपालिका शाखेतील शासकिय माहिती अधिकारी / सहाय्यक शासकिय पाहिती अधिकारी / अपीलीय प्राधिकारी (तेथील लोक प्राधिकारीच्या कार्यक्षेत्रातील) यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.**

| अ.क्र. | अधिकारी नाव व पदनाम | अधिकारी नाव व पदनाम | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी | १.श्री.प्रताप भोसले प्र.उपायुक्त तथा सहायक आयुक्त-लेखा गट अ<br><br>२.श्रीमती प्राची कचरे, सहायक आयुक्त, गट- ब<br>३. वैशाली मठपती, स्थापत्य अभियंता<br>४. युवराज विरणक, कर निर्धारण व प्रशासकीय सेवा | ०२० २६३६२३३१ |
| २. | सहायक जन माहिती अधिकारी | संकलन १ ते १० | ०२० २६३६२३३१ |
| ३. | प्रथम अपीलीय अधिकारी | श्री.प्रताप भोसले<br>सहायक आयुक्त-लेखा गट अ | ०२० २६३६२३३१ |

**मॅन्यूअल क्र. १७**
**कलम ४ (१) (ब) (xvii), कलम ४ (१) (क) व कलम ४(१) (ड)**
**नगरपालिका शाखेतील शासकिय माहितीचे प्रकाशन**

| कलम | माहितीचा प्रकार | शाखेतील अशी माहिती | प्रकाशनाची पध्दती |
|---|---|---|---|
| १. कलम ४ (१) (४) (xvii) | कार्यालयातील प्रकाशित माहिती | निरंक | |
| २. कलम ४(१) (क) | सर्व सामान्य लोकांशी संबंधित महत्वाचे निर्णय व धोरणे यांची यादी प्रकाशनाकरीता तयार करणे व वितरीत करणे. | | |
| ३. कलम ४ (१) (ड) | सर्वसाधारणपणे आपल्या कार्यालयात होणा-या प्रशासकिय / अर्धन्यायिक कामकाजाच्या प्रकाराची यादी तयार करणे | | |

1. नगरपालिका कायदयाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे- महाराष्ट्र नगरपालिका व नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 4(1) अन्वये महाराष्ट्र शासनाने प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन म्हणुन विभागीय आयुक्त यांना अधिसुचनेद्वारे घोषित केले आहे.

2. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नगरपालिका शाखेत प्रादेशिक तथा विभागीय आयुक्त यांचे अधिनस्त खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.
   1. सहआयुक्त 1 पद,उपायुक्त 1 पद ,अधीक्षक अभियंता 1 पद ,सहायक आयुक्त गट अ पद 1,सहायक आयुक्त गट ब पद 2,अधीक्षक पद 01,लेखापाल/लेखापरीक्षक 01 पद श्रेणी अ, सहायक 3 पदे अशी पदे कार्यरत आहेत.

2 नगरपालिका प्रशासनाची संबंधित नगरपरिषदांचे सार्वत्रिक निवडणुक बाबत राज्य निवडणुक आयोगाकडुन प्राप्त होणाऱ्या सुचने नुसार कामे केली जातात.

3. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील दिनांक ०१ जानेवारी २००१ रोजीचे आदेशान्वये, महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषद औदयोगिक नगरी अधिनियम 1965 मधील अधिकारांचे खालीलप्रमाणे विकेंद्रीकरण करणेत आले आहे.
   अ) महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषद औदयोगिक नगरी अधिनियम 1965 44(4), 45(5) ,
   56(4), 318, 322(3)(फ) अन्वये प्राप्त होणाऱ्या अपील/अर्जांवर कार्यवाही करणे.

4. आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासन यांचेकडील आदेशानुसार विभागातील 75 नगरपालिका/ नगरपरिषदांची वार्षिक तपासणी करणे नगरपरिषदेच्या कामावर पर्यवेक्षण/ नियंत्रण ठेवणे.

5. महानगरपालिका नगरसेवक अपात्रतेते बाबत अपील चालवणे

6. महानगरपालिकेच्या महापौर/ उपमहापौर/ स्थायी समिती व इतर समित्यांच्या सभापती पदाची निवडी बाबतची तारीख व वेळ ठरविणे.

7. महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका/ पोट निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी व इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे तसेच महानगरपालिकेतील निवडुक आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांची नोंदणी करणे इ.

8. नगरपरिषदा/ महानगरपालिका यांचे कामाकाजाचे संबंधित दाखल होणाऱ्या तक्रारी अर्जा बाबत योग्यती कार्यवाही करणे.

9. राज्य निवडणुक आयोगाकडुन प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार नगरपरिषदा निवडणुक संबंधित सदस्य संख्यानिश्चित करुन राज पत्रात प्रसिध्द करणे तसेच आयोगा कडील निवडणुक कार्यक्रमानुसार प्रभाग वार्ड रचना निश्चित करणे.

10. माहितीच्या अधिकार अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करणे.

**नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 308 चे कार्यवाहीबाबत माहिती**

1. नियमबाहय/बेकायदेशीर ठरावाची अंमलबजावणी थांबविता येते.
2. त्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 अस्तित्वात आहे
3. या अधिनियमातील 308(1) नुसार नगरपरिषदेच्या हितार्थ जिल्हाधिकारी आदेश निर्गमित करतात.
4. त्यानंतर कलम 308(2) नुसार अहवाल जिल्हाधिकारी प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन यांना सादर करतात.
5. संबंधित बाधित/हितसंबंधित नगरपरिषद कलम 308(3) अन्वये कलम 308(1) खालील आदेश मिळाल्यापासुन तीस दिवसांचे आत प्रतिवेदन सादर करु शकतात.
6. जिल्हाधिकारी यांचा अहवाल व नगरपरिषदेचे प्रतिवेदन(असल्यास) विचारात घेऊन कलम 308(4) खाली ओदश निर्गमित करण्याचे अधिकार प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांना आहेत.
7. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी कलम 308)4) अंतर्गत अंतिम आदेश निर्गमित केल्यावर सदर आदेश मुळ संचिकेसह जिल्हाधिकारी यांना पाठविणेत येतो. त्यामुळे बेकायदेशीर ठरावाची अंमलबजावणी टाळता येणे शक्य होते व नगरपालिकेचे हित जोपासले जाते.